महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-७ अंक-६ सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर-२०१२

**प्रिय कर्मचारी बंधू-भगिनींनो,**

आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत आपण बऱ्यापैकी वेळ कामाचे नियोजन करण्यात खर्च केला आहे. वर्षाचा उरलेला वेळ ठरविलेली लक्ष्य गाठण्यात खर्च व्हायला हवा. याआधीच्या चांगल्या कामगिरीमुळे आपल्या विश्वस्तांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत आणि आपण त्या पूर्ण करायला हव्यात. ऊर्जा क्षेत्रातील प्रगती आपल्यासमोर नवनवी आव्हाने उभी करीत आहे. त्यापैकी बऱ्याच आव्हानांवर आपण यशस्वी मात केली आहे आणि यापुढेही त्यादृष्टीने प्रयत्न करूया. संस्थेची विस्तार योजना राबवताना दरवर्षी आपला भांडवली खर्च वाढत आहे. आपली विस्तार योजना STU च्या योजनेनुसार ठरते, ज्याच्यासाठी CEA, PGCIL, IPPs, Mahagenco व Distribution Utilities यांच्या गरजा हा त्याचा आधार असतो. आपल्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी REC, PFC, IFC आणि बँकाकडून कर्ज घ्यावी लागतात. या वित्तीय संस्था आपली कर्ज परत करण्याची क्षमता लक्षात घेऊन आपल्याला मदत करत असतात आणि म्हणून महसूल मिळवण्यासाठी आपल्याला ठरवून दिलेले लक्ष्य आपण वेळेत गाठले पाहिले.

वर्षाच्या मध्यावर विविध विभागांना ठरवून दिलेल्या लक्ष्यांचा आढावा घेतला असता काही त्रुटी बघून मी अस्वस्थ झालो. बहुतांश कामांच्या बाबतीत आपण योग्य मार्गावर असलो. तरी नवीन प्रकल्पांच्या बाबतीत काही मुद्दे शिल्लक राहतात. KPI लक्ष्य गाठण्यासाठी वेगाने काम करण्याची गरज आहे ज्यामध्ये कामाच्या अनुशेषाचाही समावेश आहे. प्रकल्प राबवत असताना येणाऱ्या सुरुवातीच्या अडचणींची मला जाणीव आहे. त्यासाठी या क्षेत्रात कार्यरत इतर संस्थांच्या सहकार्याची गरज आहे. इथे योग्य नियोजनाची तसेच संस्था व व्यक्तींना योग्य पद्धतीने हाताळण्याची व पाठपुरावा करण्याची गरज आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्याने कंपनीवरील आर्थिक भार वाढतो आणि नफा कमी होतो. महापारेषण कंपनीच्या स्थापनेपासून आपण सातत्याने चांगला नफा कमावला आहे हे सांगण्याची मला याठिकाणी गरज वाटत नाही.



२०१२-१३ च्या पहिल्या सहामाहीत काही महत्त्वाच्या उपकेंद्रांमध्ये वारंवार बिघाडाच्या घटना घडल्या. प्रत्येक बिघाडामुळे कंपनीचे नुकसान झाले. विविध अत्याधुनिक यंत्रणा व कार्यपद्धतींमुळे असे बिघाड टाळता येऊ शकतात. आपली कार्यक्षमता वाढवण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा व कार्यपद्धतींचा योग्य वापर व्हायला हवा. तसेच पडून राहिलेल्या वस्तूंची संख्या ही आपल्यापुढची मोठी समस्या आहे. असलेल्या वस्तूंच्या योग्य वापराबद्दल आवश्यक सूचना दिल्या गेल्या आहेत. त्याचे उल्लंघन करू नये व तसे झाल्यास कठोर कारवाई केली जाईल. वस्तूंचा योग्य वेळी वापर न झाल्यास त्याचा परिणाम उत्पादकतेवर होतो आणि आपला खर्च वाढतो.

वाहिन्या तसेच उपकेंद्रांच्या उभारणीला होणारा विलंब, उपकेंद्रांमध्ये वारंवार होणारे बिघाड, तसेच पडून राहिलेल्या वस्तूंची वाढती यादी या सध्याच्या आव्हानांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. आपल्यापुढच्या अडचणींविषयी आपण सखोल चर्चा केलेली आहे आणि त्यातून मार्गही सुचविला आहे. विविध परिमंडलातील कार्यालये व सांघिक कार्यालयातील टीम समन्वयाने काम करून योग्य ती कार्यवाही करून सुचविलेल्या मार्गाने अडचणींवर योग्य ती उपाययोजना करतील असा मला विश्वास आहे.

आपण अधिक काटेकोरपणे काम करून कंपनीला प्रगतीपथावर न्याल अशी मला खात्री आहे. नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**- अरविंद सिंह**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**Dear Colleague,**

We have spent considerable time in planning our work in the first quarter of the year. The remaining period of the year must be judicially used for achievement of our targets. The expectations from our stakeholders are now high because of our continued good performance in the past and we must make conscious efforts to live up to them. Developments in the energy sector are throwing new challenges before us. We have successfully overcome most of them and shall continue to do our best. Our capital expenditure has increased substantially year on year to cater to our expansion plan. Our expansion plan is derived from the STU plan, which is drawn considering inputs and requirements from the CEA, PGCIL, IPPs, Mahagenco and Distribution Utilities. Our financial needs were met by borrowings from the REC, PFC, Banks and the IFC. We have been assisted by financial institutions considering our repayment capabilities and therefore we must achieve our performance targets to ensure the early realization of revenue receipts.

After the mid-year review of the departments' targets, I am perturbed to see some gaps. We are on track on most items of work but there are some issues in respect of completion of new projects. Monitoring and execution of these needs to be geared up to complete the KPI targets, including any backlog work. I am aware that there are teething troubles in project execution, which require support from multiple agencies for smooth implementation. Here, we must plan well and tackle all agencies and individuals appropriately, if required repeatedly. Non-completion of projects in time raises our Company's financial burden and will reduce our profits. I need not emphasize here that MSETCL has earned handsome profits year on year, since inception.

There have been repeated incidences of major occurrences at important sub-stations during the first half of 2012-2013. Every major occurrence results in losses for MSETCL. Various sophisticated equipment and methods are now available to eliminate such occurrences. They need to be put to use effectively to avoid such occurrences that damage our system and productivity. Similarly piling up of inventory is also a matter of concern before us. The guidelines given in this regard for use of idle inventory must be meticulously followed and any violation dealt with strictly. Holding inventory for long periods of time affects equipment and also adds to our costs.

I have raised concerns over our current challenges: delayed project work in respect of substations and lines as well as repeated major occurrences and piling up of inventory. We held long deliberations on our difficulties and come out with solutions. It is expected from field units and the corporate team that they will take effective steps to reduce the burden of time and cost overruns and also improve productivity and cut costs by preventing major occurrences and liquidating idle inventory.

I am sure you will continue to work with diligence and take the organization's journey forward to the next level of excellence. My best wishes to you for the New Year.

**Arvind Singh**

**Chairman and Managing Director**



केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पी. उमा शंकर यांनी नुकतीच महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालयाला भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचे स्वागत करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची पुणे परिमंडलास भेट



२२० केव्ही गणेशखिंड उपकेंद्राची पाहणी करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह, संचालक (प्रकल्प) श्री.ओमप्रकाश एम्पाल व इतर मान्यवर

म.रा. विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.अरविंद सिंह, यांनी अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे येथे नुकतीच भेट दिली.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.पी.आर. देवरे यांनी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वागत केले. पुणे भेटीत त्यांच्या सोबत संचालक (प्रकल्प) श्री.ओमप्रकाश एम्पाल उपस्थित होते.

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे अंतर्गत प्रकल्प व इतर कामांचा आढावा घेतला. या भेटीत अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे येथे त्यांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांसाठीच्या विश्राम खोलीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी २२० केव्ही गणेशखिंड उपकेंद्राची पाहणीही केली.

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते राज्य भार प्रेषण केंद्राच्या नवीन इमारतीमधील नियंत्रण कक्ष कार्यान्वित

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र ऐरोली, येथील नवीन इमारतीमधील नियंत्रण कक्षाचे कार्यान्वयन महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. अरविंद सिंह, यांच्या शुभहस्ते नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी आयईसी १०४ प्रोटोकॉलवर आधारित नवी प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. या समारंभासाठी श्री.उत्तम झाल्टे, संचालक (संचलन), श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन / मा.सं.), श्री.देवरे, संचालक (संचलन), महावितरण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. देवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

नव्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन करताना खूप समाधानी आहे अशी प्रतिक्रिया अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी व्यक्त केली. नियंत्रण कक्षाचे काम अतिशय उत्कृष्ट झाले असून हा नियंत्रण कक्ष देशातील सर्वोत्कृष्ट असावा असं मतंही त्यांनी व्यक्त केलं. नवी आव्हानं पेलण्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाचीच मदत होणार आहे असं श्री. सिंह यांनी स्पष्ट केलं. आजच्या काळात भार प्रेषण केंद्राचं महत्त्व लक्षात घेता अशा ठिकाणी उत्कृष्ट कौशल्य असलेल्या मनुष्यबळाला काम करण्याची संधी द्यायला हवी असं मत अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी व्यक्त केलं.

याप्रसंगी बोलताना संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे यांनी सध्याच्या काळात ग्रिड सुरक्षेसाठी भार प्रेषण केंद्राची महत्त्वपूर्ण भूमिका विषद केली. भार प्रेषण केंद्राचा स्टाफ अत्यंत दक्ष झाला आहे असे नमूद करुन महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा नवा नियंत्रण कक्ष पाहण्यासाठी देशातील इतर राज्यांची रांग लागेल असे कौतुकोद्गार काढले.

संचालक (प्रकल्प) श्री. ओमप्रकाश एम्पाल यांनी आपल्या भाषणात राज्य भार प्रेषण केंद्राचा नवा नियंत्रण कक्ष तांत्रिकदृट्या नेहमी अद्ययावत राहावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन / मा.सं.) यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भार प्रेषण केन्द्राच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक अडचणींवर मात करत नव्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन होत असताना स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद होतोय अशी प्रतिक्रिया श्री. केळकर यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.संजय शिंदे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र ऐरोली यांनी प्रास्ताविक करुन नव्या प्रणालीची थोडक्यात माहिती दिली व महत्त्व विषद केले. सदर कार्यक्रमास श्री. वाडेकर, मुख्य अभियंता,महावितरण भांडूप परिमंडल, व श्री. मुंढे, मुख्य अभियंता, महावितरण कल्याण परिमंडल,तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र ऐरोली, या कार्यालयातील श्री.जे. डी. तायडे, अधीक्षक अभियंता (प्रशासन/मा.तं.), श्री.बी.एच. गुजराथी, अधीक्षक अभियंता (ऊर्जा लेखांकन) यांच्यासह सर्व अभियंते व इतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.वसंत पांडे, कार्यकारी अभियंता यांनी केले व आभारप्रदर्शन डॉ.संजय कुलकर्णी, अधीक्षक अभियंता (संचलन) यांनी केले.

## नव्या नियंत्रण कक्षाचे फायदे

नव्या नियंत्रण कक्षात अत्याधुनिक IEC १०४ प्रोटोकॉलवर आधारित प्रणाली कार्यान्वित आहे. या प्रणालीद्वारे महापारेषण कंपनीच्या १४० महत्वाच्या उपकेंद्रांमधून पारेषण प्रणाली नियंत्रित करण्यासाठी हवी असलेली माहिती मिळणार आहे. सदर प्रणालीद्वारे महाराष्ट्राच्या पारेषण वाहिनीच्या संचलनासाठी आवश्यक असलेली निरीक्षण (Observation) व नियंत्रणक्षमता (Controllability) वाढली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या मोठया राज्यातील पारेषण वाहिनी व्यवस्थितपणे चालविण्यास मदत होणार आहे.

# नव्या नियंत्रण कक्षाच्या कार्यान्वयन सोहळ्यातील क्षणचित्रे


















## सांघिक कार्यालयात संविधान दिन साजरा





सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह होते.

संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी बोलताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी प्रशासकीय सेवेच्या परीक्षेची तयारी करतानाच्या आठवणींना उजाळा दिला. घटनेचा अभ्यास केल्यास त्याचा कसा फायदा होतो हे त्यांनी सांगितले.

संचालक (संचलन ) श्री. उत्तम झाल्टे यांनी भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क या विषयावर आपले विचार मांडले. भारतासारख्या खंडप्राय देशाची एकता टिकवून लोकशाही व्यवस्था मजबूत करण्याचे काम राज्यघटना करत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत भारताचा कारभार राज्यघटनेच्या आधारे चालतो यातच घटनेचे सामर्थ्य व यश दडलेले आहे असे श्री. झाल्टे म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायासाठी झगडले. या देशात सामाजिक न्यायासाठी त्यांनी केलेले कार्य हे अतुलनीय आहे. बाबासाहेबांनी लिहिलेले The Problem Of Rupee हे पुस्तक अभ्यासू आजही अभ्यासतात. कर्मचाऱ्यांनी वेळ मिळेल तेव्हा जरुर घटनेचा अभ्यास करावा असे आवाहन श्री. झाल्टे यांनी केले. अधिकाऱ्यांनी घटनेचा अभ्यास केल्यास त्यांची विविध प्रश्नांकडे बघण्याची दृष्टी बदलेल व कारभारात सुधारणा होईल असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन/मासं), सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## २२० केव्ही उपकेंद्र पुसद येथे संविधान दिन साजरा



अमरावती परिमंडलाअंतर्गत २२० केव्ही उपकेंद्र पुसद येथे २६ नोव्हेंबर २०१२ रोजी सर्व कर्मचारी व अधिकारी वर्गातर्फे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी पुसद येथील गझलकार श्री. खराटे काका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री.आर.आर. भोयर उप.का.अ. यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सर्वांना मार्गदर्शन केले. श्री.ए.के. बोभाटे क.अभि., श्री.पी.व्ही. कनाके सहा.अभियंता, श्री.एन.पी.भाटी, सहा. अभि. यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संविधान दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.मसुद पटेल क.तं. व आभार प्रदर्शन श्री.र.वा. देशमुख कं.तं. यांनी केले. या कार्यक्रमाला २२० केव्ही उपकेंद्र पुसद, वाहिनी देखभाल उप-विभाग पुसद व ४०० के.व्ही. उपविभाग पुसदच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली.

## नागपूर परिमंडलात चाचणी व संचारण विषयावर कार्यशाळा संपन्न





चाचणी व संचारण प्रविभाग नागपूर तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र कळवा यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्रात नुकतेच एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत Testing Awareness व Awareness Programme for RTU-DC-SCADA या विषयांवर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेचा शुभारंभ श्री.एल.एस. सोनकवडे, मुख्य अभियंता, अउदा, संवसु परिमंडल, नागपूर तसेच श्री.एस.टी. शिंदे, मुख्य अभियंता, म.रा.भा.प्रे.कें. कळवा यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

कार्यशाळेच्या पूर्वार्धात 'Testing Awareness' या विषयावर चाचणी व संचारण प्रविभाग नागपूर तर्फे श्री.एस.डी. रानडे, उपकार्यकारी अभियंता व श्री.एम.एस. तट्टे, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, नागपूर यांनी उपस्थित अभियंत्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर Awareness programme for RTU-DC-SCADA & Tulip communication for visibility of real time data to MSLDC, Airoli. या विषयावर श्री.एस.जे. पाटील, अधीक्षक अभियंता म.रा.भा.प्रे.केन्द्र, कळवा यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला अ.उ.दा. सं.व.सु. परिमंडलांतर्गत सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, सबस्टेशन इनचार्ज तसेच IIP's/CPP's उपस्थित होते. कार्यशाळेत उपस्थित अभियंत्यांना संबंधित विषयाचे Study Material उपलब्ध करून देण्यात आले. सदर कार्यशाळेत मा.श्री.सोनकवडे मुख्य अभियंता व मा.श्री.शिंदे मुख्य अभियंता यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उत्तरार्धात M/s Tulip, Ms/ M.B. Control, M/s Siemens, M/s Midass Telesoft Pvt. Ltd., Ms/ Signet, M/s Stretto enterprises यांनी त्यांच्या product/system बद्दल माहिती दिली.

सदर कार्यशाळेला उपस्थित असलेल्या अभियंत्यांनी लेखी प्रतिसादात कार्यशाळा उत्तम झाल्याचा अभिप्राय नोंदविला. तसेच अशा प्रकारची कार्यशाळा Shift Incharge करीता सुद्धा आयोजित करण्यात यावी असे सुचविले. अशा प्रकारच्या कार्यशाळेव्यतिरिक्त Online Training Modules विकसित करून कंपनीच्या वेबसाईटवर टाकण्यात यावी असे नमूद केले.

सदर कार्यशाळेचे आयोजन मा.श्री.कोंडावर अभियंता, चाचणी व संचारण प्रविभाग नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळा यशस्वी करण्याकरिता श्री.एस.डी.रानडे, उपकार्यकारी अभियंता, कु.व्ही.डी. पाटील, उपकार्यकारी अभियंता, श्रीमती एस.आर.जारोंडे, उपकार्यकारी अभियंता, कु.एन.आर. लोखंडे, कनिष्ठ अभियंता, श्री.गभणे, कनिष्ठ अभियंता, श्री.मांडवेकर, श्री. कछवाहा, श्री.देखमुख ह्यांनी परिश्रम घेतले.

### आवाहन

**प्रिय वाचकहो,**

**महापारेषण समाचारच्या पुढील अंकासाठी परिमंडलात संपन्न झालेले महत्त्वपूर्ण कार्यक्रम, तांत्रिक घडामोडी, कंपनीतील कर्मचाऱ्यांनी अथवा त्यांच्या पाल्यांनी मिळविलेले यश आदी बातम्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीने महापारेषण समाचारच्या पत्त्यावर पाठवाव्यात.**

## सांघिक कार्यालयात सर्वेक्षण व परीक्षण विभागातील अधिकाऱ्यांची बैठक व कार्यशाळा संपन्न





महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालयात अ.उ.दा. बांधकाम विभागातील सर्वेक्षण व परीक्षण उपविभागीय अधिकाऱ्यांची बैठक व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.श्री.विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) यांनी मार्गदर्शनपर भाषणात सदर बैठकीचे प्रयोजन व कारणमीमांसा स्पष्ट केली.

अ.उ.दा. बांधकाम विभाग, औरंगाबाद येथील सर्वेक्षण व परीक्षण उपविभागात कार्यरत असणारे श्री.एस.पी. कांबळे, उपकार्यकारी अभियंता यांनी वन विभागाच्या परवानगीसाठी प्रस्ताव कसे सादर करावयाचे याबाबत सविस्तर विवेचन केले व त्यासाठी लागणाऱ्या विविध कागदपत्रांच्या प्रती नमुना म्हणून अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केल्या. श्री.एस.एम. कादरी, अधीक्षक अभियंता (अभिकल्प व अभियांत्रिकी-वाहिनी) यांनी वाहिनी उभारताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय याबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी वाहिन्या उभारताना घ्यावयाची काळजी व त्या अनुषंगाने अनेक मुद्दयांचा परामर्श घेतला. कार्यशाळेचा समारोप करताना श्री.श्रीधर मोरे, मुख्य अभियंता (प्रकल्प व अभिकल्प) यांनी उपस्थित अधिकाऱ्यांच्या विविध शंका आणि प्रश्नांविषयी सुसंगत व समर्पक उत्तरे देऊन अधिकाऱ्यांचे समाधान केले. श्री. मोरे यांनी वाहिन्यांचे विविध प्रकारचे क्रॉसिंग म्हणजेच रेल्वे, वन, रस्ते, नदी, खाडी इत्यादी क्रॉसिंगबाबत घ्यावयाची काळजी यासंदर्भात महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

श्री.एस.एस.अपराज, उप कार्यकारी अभियंता (सर्वेक्षण व परीक्षण), अ.उ.दा. उपविभाग, कोल्हापूर यांनी सर्वेक्षण व परीक्षण विभागातील अधिकाऱ्यांची सांघिक कार्यालयात कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल आभार मानले. तसेच त्यांनी यामुळे क्षेत्रिय व मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांमध्ये थेट संवाद निर्माण होऊन मिळालेल्या मार्गदर्शनाचा निश्चितपणे उपयोग होईल असेही सांगितले.

अभिकल्प व अभियांत्रिकी-वाहिनी विभागातील अभियंते व कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नाने सदरची कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. श्री.विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सांघिक कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी 'आग सुरक्षा' विषयावर व्याख्यानाचे आयोजन

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या सूचनेनुसार तसेच संचालक (संचलन) यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी दोन वेळा ''आग सुरक्षा'' या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

मुंबई फायर ब्रिगेडचे अग्निशमन अधिकारी श्री.रमेश भोर यांनी ''आग सुरक्षा'' या विषयावर सहज व सोप्या शैलीमध्ये, पॉवर पॉइन्ट तसेच स्लाइड शो द्वारे व्याख्यान दिले. याप्रसंगी श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) उपस्थित होते. व्याख्यानानंतर उपस्थित कर्मचाऱ्यांनी अग्निशमन अधिकारी श्री. भोर यांना आगीसंबंधी विविध प्रश्न विचारले. त्यावर श्री. भोर यांनी समर्पक उत्तरे देऊन उपस्थितांच्या मनातील शंकांचे निरसन केले.

दि. ०५.०९.१२ रोजी श्री. हरीदास चौधरी, अग्निशमन सल्लागार आणि मुख्य अग्निशमन अधिकारी, महाऔष्णिक विद्युत केंद्र, महानिर्मिती, चंद्रपुर यांनी अग्निप्रतिबंध व अग्निशमन या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानामुळे उपस्थितांना आगीचे प्रकार, आग विझवण्याचे मार्ग, आग लागू नये यासाठी घ्यावयाची काळजी, तसेच आग लागल्यास स्वत:च्या व सहकाऱ्यांच्या बचावासाठीचे उपाय अशा अनेक विषयांबाबत अतिशय मोलाची माहिती समजली.

याप्रसंगी श्री.अमृत बोरीचा, मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी प्रस्तावनापर भाषणाद्वारे महापारेषणचे सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे योजलेल्या अग्निप्रतिबंध उपायांबाबत सर्वांना अवगत केले. श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन ढवण यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास श्री. कावळे, मुख्य अभियंता (स्था.), श्री. आर.सुरेश, मुख्य अभियंता (पारेषण संचलन), श्री.आर.डी. चव्हाण, मुख्य अभियंता (कंत्राट व अनुश्रावक); श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता (मासंवि); श्री.माधव पेन्दोर, मुख्य महाव्यवस्थापक (मासं); श्री.आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (विवले); श्री.सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मांस) तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व सुरक्षा रक्षक उपस्थित होते.

## वाशी परिमंडल येथे उत्कृष्ट उपकेंद्र पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न



उद्घाटनप्रसंगी मुख्य अभियंता श्री. विकास बढे प्रास्ताविक सादर करतांना

महापारेषण कंपनीच्या वतीने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उपकेंद्र व त्या उपकेंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या उत्तम कामगिरीस प्रोत्साहन मिळावे म्हणून दरवर्षी उत्कृष्ट उपकेंद्राची निवड केली जाते. त्यानुसार यावर्षी परिमंडल स्तरावर वाशी परिमंडलातील विविध उपकेंद्रांना वर्ष २०११-१२ साठी उत्कृष्ट उपकेंद्र म्हणून गौरविण्यात आले. हा गुणगौरव समारंभ विष्णुदास भावे सभागृह वाशी येथे संपन्न झाला. या समारंभात परिमंडल स्तरावर निवड केलेल्या उत्कृष्ट उपकेंद्रास स्मृतीचिन्ह, प्रशस्तिपत्रक व या उपकेंद्राच्या उत्कृष्ट कामाकरिता हातभार लावलेल्या कर्मचाऱ्यांना अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच ज्यांना पुरस्कार मिळाले नाहीत, त्यांनी अधिक जोमाने काम करुन पुढील वर्षी पुरस्कार मिळवण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले. कंपनीच्या रिवॉर्ड स्कीममध्ये वाशी परिमंडलाची कामगिरी उत्कृष्ट असल्याचेही श्री. सिंह यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), श्री.प्रतापराव मोहिते, संचालक (वित्त), श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन/मासं), श्री. विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) उपस्थित होते. यावेळी राज्य स्तरावर नामांकन करण्यात आलेल्या उत्कृष्ट उपकेंद्रांचाही प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. मुख्य अभियंता श्री. विकास बढे यांनी प्रास्ताविक केले. वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री. पी.जे. कुलकर्णी यांनी आभार मानले.

| अ.क्र. | गट | पुरस्कारप्राप्त उपकेंद्र | |
|---|---|---|---|
| १ | १३२ के.व्ही. व १०० के.व्ही. उपकेंद्र गट | प्रथम क्रमांक | १०० के.व्ही. उपकेंद्र, शहापूर |
| | | द्वितीय क्रमांक | १०० के.व्ही. उपकेंद्र, पडघे |
| २ | २०० के.व्ही. उपकेंद्र गट | प्रथम क्रमांक | २०० के.व्ही. उपकेंद्र, नेरूळ |
| | | द्वितीय क्रमांक | २०० के.व्ही. उपकेंद्र, महाड |
| ३ | वाहिनी देखभाल उपविभाग गट | प्रथम क्रमांक | २२० के.व्ही. वाहिनी देखभाल उपविभाग, पडघे |
| | | द्वितीय क्रमांक | २२० के.व्ही. वाहिनी देखभाल उपविभाग, कळवा |
| ४ | हॉट लाईन मेंटेनन्स युनिट गट | प्रथम क्रमांक | हॉट लाईन मेंटेनन्स युनिट, कळवा |



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना हॉट लाईन मेंटेनन्स युनिट, कळवा




संचालक (प्रकल्प) श्री. ओमप्रकाश एम्पाल यांच्या हस्ते द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना १०० केव्ही उपकेंद्र, पडघे



कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. विजय लाटे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह

## अकोला येथे २०० एमव्हीए क्षमतेच्या रोहित्राची उभारणी नियोजित वेळेत पूर्ण



वीजेची वाढीव मागणी पूर्ण करण्यासाठी, तसेच भविष्यात उपलब्ध होणाऱ्या वीजेच्या वहनासाठी स्वत:ला सक्षम करणाऱ्या महापारेषण कंपनीच्या धोरणानुसार २२० के.व्ही. उपकेंद्र अकोला येथील २२०/१३२ के.व्ही. १५० एम.व्ही.ए. रोहित्र काढून त्या ठिकाणी नवीन २०० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र सप्टेंबर महिन्यात नियोजित वेळेत उभारण्यात आले. २२० के.व्ही. उपकेंद्रामध्ये रोहित्रावर भार व्यवस्थापन करणे कठीण काम होते. त्यामुळे पावसाळयात ऑगस्ट महिन्यामध्ये रोहित्र बदलण्याचे काम सुरू केले. भर पावसामध्ये रात्रंदिवस सर्व कर्मचाऱ्यांनी अविरत परिश्रम घेऊन ठरलेल्या वेळेमध्ये काम पूर्ण केले.

वरील कामाअंतर्गत १३२ के.व्ही. बे चे ट्विन कंडक्टर करणे तसेच संपूर्ण रोहित्र व बे चे नूतनीकरण ज्यामध्ये संपूर्ण सीटी, एलए बदलणे याचा समावेश आहे सदर कामामध्ये श्री.आर.एन.फरकाडे, कार्यकारी अभियंता, यांनी वेळोवेळी बहुमूल्य मार्गदर्शन केले तसेच काम बार चार्ट प्रमाणे वेळेत करण्यासाठी २२० के.व्ही. उपकेंद्र अकोला, प्रभारी उपकार्यकारी अभियंता श्री.डी.एन. शेगोकार व त्यांचे तांत्रिक कर्मचारी व श्री.पी.वाय. देशमुख, उपकार्यकारी अभियंता, व श्री.काळे कनिष्ठ अभियंता वाहिनी देखभाल पथक अकोला यांच्या टीमने विशेष मेहनत घेतली तसेच सदर कामात श्री.आर.के. वानखेडे, उपकार्यकारी अभियंता हॉट लाईन युनिट अकोला, तसेच चाचणी विभागातर्फे श्री.हनवंते, जामनिक, श्री.डुबे, श्री.सवई, सहाय्यक अभियंता व त्यांचे कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

रोहित्र उभारणी नियोजित कालावधीत पूर्ण केल्याबद्दल श्री.वाय.जी. गजभिये, अधीक्षक अभियंता यांनी २२० के.व्ही. उपकेंद्र अकोला येथील प्रभारी उपकार्यकारी अभियंता श्री.डी.एन. शेगोकार व त्यांच्या चमूचे अभिनंदन केले.

## मानेगांव (जि. सोलापूर) येथे १३२ केव्ही उपकेंद्राचे भूमिपूजन




अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे अंतर्गत मानेगांव जि. सोलापूर येथे १ ३ २ केव्ही उपकेंद्राच्या कामाचे श्री.पी.आर. देवरे, मुख्य अभियंता (पुणे परिमंडल) यांचे हस्ते नुकतेच भूमिपूजन करण्यात आले.

सदर १ ३ २ केव्ही उपकेंद्रामुळे मानेगांव जि.सोलापूर येथे व परिसरात पुरेशा दाबाने वीजेचा पुरवठा होण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी व गावात घरगुती व इतर वीजेच्या पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

सदर कार्यक्रमास श्री.एम.आर.भगत, अधीक्षक अभियंता (स्थापत्य-पुणे), श्री.आर.एल. गायकवाड, अधीक्षक अभियंता (बांधकाम मंडल-पुणे), श्री.गोविंदसा मेहरवाडे कार्यकारी अभियंता (स्थापत्य-सोलापूर) व कंपनीचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कराड परिमंडलात खेळाडूंची निवड चाचणी संपन्न



केरळमधील तिरूअनंतपुरम येथे झालेल्या ३८ व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळ व्हॉलीबॉल क्रिडास्पर्धा -२०१२ साठी महापारेषण कंपनीच्या खेळाडूंचे चाचणी शिबीर म.रा.वि.मं. कर्मचारी वसाहत विजयनगर, कराड येथील क्रिडांगणावर संपन्न झाले. श्री.जी.टी. मुंडे, मुख्य अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरास वसाहतातील कर्मचारी प्रतिनिधींनी मोलाचे सहकार्य केल्याचे मनोगत सर्व खेळाडूंनी व्यक्त केले. या शिबिरादरम्यान देण्यात आलेल्या सुविधा तसेच राहण्याच्या सोयीची सर्व खेळाडूंनी प्रशंसा केली. श्री.व्ही.एम. लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) व कराड परिमंडलातील अधिकारी / कर्मचारी यांच्या शुभेच्छांसह सर्व खेळाडू व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी तिरूअनंतपुरमला रवाना झाले.

## वाशी परिमंडल येथे महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी



दि. ०२ ऑक्टोबर २०१२ रोजी अउदा बांधकाम-नि-संवसु परिमंडल, वाशी येथे महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. श्री.प्रकाश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) यांनी प्रास्ताविक केले. श्री.विकास बढे, मुख्य अभियंता वाशी यांनी महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कर्मचाऱ्यांसमोर आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास श्री.ए.व्ही. कसबेकर, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), सौ.सीमा डुबेवार, सहाय्यक महाव्यवस्थापक (वि.व ले.) यांच्यासमवेत कार्यकारी अभियंते श्री.एम.एस.वेस्ली, श्री.पी.एस. शर्मा, श्री.बी.डी.जावीर, श्री.एस.एल. मोगडपल्ली, श्री.एस.एन. सूर्यवंशी व उपकार्यकारी अभियंते श्री.प्रशांत कुलकर्णी, श्री.डी.पी. नंदनवार, तसेच श्री.एम.एम.नाईक, कनिष्ठ अभियंता (स्था) आणि श्री.जे.डी. जगताप, श्री.एम.डी. सावरकर, उपव्यवस्थापक (मासं), यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

## कनिष्ठ अभियंत्यांचे इंडक्शन ट्रेनिंग पडघे येथे संपन्न



इंडक्शन ट्रेनिंग कार्यक्रमात मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी (बसलेले), सहभागी झालेले कनिष्ठ अभियंते व इतर (उभे)

महापारेषण कंपनीच्या वाशी, पुणे, नाशिक या परिमंडलातील तसेच सांघिक कार्यालयातील कनिष्ठ अभियंत्यांसाठीचे इंडक्शन ट्रेनिंग पडघा येथे संपन्न झाले. श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाची सांगता झाली. ३० दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थींसाठी ४ फिल्ड व्हिजिटचे आयोजन करण्यात आले.

सांगता समारंभात बोलताना संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे यांनी १९६० सालापासून ऊर्जाक्षेत्रात झालेल्या महत्त्वाच्या बदलांचा आढावा घेतला. महापारेषण कंपनीतील आजचे कनिष्ठ अभियंते म्हणजे कंपनीचे आधारस्तंभ आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा आहे. त्यांना बहुआयामी, अधिक कार्यक्षम होण्यासाठी अशा प्रकारच्या निवासी प्रशिक्षणाची गरज असल्याचे श्री. झाल्टे यांनी सांगितले. फॅसिलिटीपेक्षा फॅकल्टी चांगल्या हव्यात या हेतूने या निवासी प्रशिक्षणाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

पडघे येथे प्रशिक्षण देण्यामागची भूमिका श्री. झाल्टे यांनी यावेळी विषद केली. महापारेषण कंपनीत पडघे हे खऱ्या अर्थाने पॉवर स्टेशन आहे. इथे अभियंत्यांना लाईव्ह ट्रेनिंग देण्याचा प्रयत्न असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. याप्रसंगी मुख्य अभियंता (मासं) श्री. बी.टी. राऊत, मुख्य अभियंता श्री.विकास बढे (वाशी परिमंडल), अधीक्षक अभियंता श्री. एस.एस. राजूरकर, अधीक्षक अभियंता श्री. विजय पाटील, अधीक्षक अभियंता श्री.वंदन मेंढे, कार्यकारी अभियंता श्री मधुसूदन देशमुख उपस्थित होते. महाव्यवस्थापक (मासं) श्री. सुगत गमरे यांनी सांगता कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.



इंडक्शन ट्रेनिंगमध्ये सहभागी कनिष्ठ अभियंते



सांगता समारंभात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे

## वाशी परिमंडलात Performance Appraisal कार्यशाळा संपन्न



महापारेषण कंपनीच्या वेतनगट १ व २ मधील सर्व तांत्रिक / अतांत्रिक अधिकाऱ्यांसाठी वार्षिक मूल्यमापन अहवाल (Performance Appraisal System) पद्धती अंमलात आणण्यात आलेली आहे. वाशी परिमंडलांतर्गत खारघर येथे श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (मासं/ संचलन), श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता (मासंवि), श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं-तांत्रिक) यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना नवीन वार्षिक मूल्यमापन पद्धतीची सविस्तर माहिती दिली. तसेच अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

श्री.चंद्रकांत भोसले, अधीक्षक अभियंता, पनवेल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाचे संयोजन श्री.आर.एन.कोल्हे, कार्यकारी अभियंता, श्री.पी.जे. कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) व श्री.डी.पी. दाईगडे, उपकार्यकारी अभियंता यांनी केले. सदर कार्यशाळेस श्री.बी.एल. पसरटे, अधीक्षक अभियंता, चाचणी व संचारण मंडल, वाशी आणि पनवेल परिसरातील सुमारे १६० अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (मासं/संचलन) यांच्या हस्ते ४०० केव्ही. ग्रहण केंद्र संवसु विभाग, खारघर चे माहिती पुस्तिका (Manual) चे अनावरण करण्यात आले.

कळवा संकुलात झालेल्या कार्यक्रमात सतीश गहेरवार, राजकुमार कांबळे, अविनाश कसबेकर, विजय पाटील या अधीक्षक अभियंत्यांचे उपस्थितीत श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं-तांत्रिक) यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना ''वार्षिक मूल्यमापन अहवाल'' पद्धतीबाबत माहिती दिली. श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (मासं/ संचलन) तसेच श्री. सुगत गमरे महाव्यवस्थापक (मासं-तांत्रिक) यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. सदर कार्यक्रमाचे संयोजन श्री.श्रीकांत वेल्हाळ, उपव्यवस्थापक (मासं) कळवा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

## पुणे परिमंडलात Performance Appraisal या विषयावर कार्यशाळा



अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे येथे Performance Appraisal या विषयावर नुकतेच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन तथा मा.सं.), श्री.बी.टी.राऊत, मुख्य अभियंता (मा.सं.) व श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं./तांत्रिक) यांनी यावेळी अधिकारी कर्मचारीवर्गास Performance Appraisal या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेस अधिकारी व कर्मचारी यांनी मोठया संख्येन उपस्थित राहून वरिष्ठांकडून शंका निरसन करून घेतले. कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुख्य अभियंता श्री.पी.आर.देवरे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्वागत केले. सदर कार्यक्रमास श्री.एम.आर. भगत, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), श्री.अनिल कोलप अधीक्षक अभियंता (अउदा संवसु), श्रीमती विजया मुखेडकर – अधीक्षक अभियंता (चाचणी) उपस्थित होते.

श्री.दिलीप केसकर, उप का.अ. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री.राहुल सुतार- सहा. महाव्यवस्थापक (मासं), सौ.प्रणिता ताम्हाणे- व्यवस्थापक (मासं), श्री.सतिश काळे, श्री.सचिन कडलग, श्री.रमेश कांबळे व कु.वैशाली रामटेके, उप व्यवस्थापक (मासं) यांनी कार्यक्रमाची संयोजन केले. कु.स्नेहल जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सूचना

**महापारेषण समाचार साठी मजकूर पाठवताना तो कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत पाठवावा. छायाचित्रे दर्जेदार असावीत. मजकूर इंग्रजीत असल्यास तो ओपन फाईलमध्ये व मराठीत असल्यास पीडीएफ स्वरूपात खालील ई-मेलवर पाठवावा.**

**prohr@mahatransco.in**

## अमरावती परिमंडलात ''कृती मूल्यमापन प्रणाली'' कार्यशाळा संपन्न





महापारेषण कंपनीतील वेतन गट १ व २ मध्ये कार्यरत सर्व अधिकाऱ्यांकरिता वर्ष २०११-१२ पासून पूर्वीची गोपनीय अहवाल पद्धत बंद करून ''कृती मूल्यमापन प्रणाली'' अमलात आलेली आहे. ही पद्धत यशस्वीरित्या राबवण्यासाठी सांघिक कार्यालयातर्फे अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल अमरावतीसाठी डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय विकास प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती येथे ऑक्टोबर महिन्यात कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यक्रम कार्यकारी संचालक (संचलन/मासं) श्री. सुभाष केळकर, मुख्य अभियंता (मासं) श्री. बी.टी.राऊत तसेच श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं-तां.) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. रोकडे, अधीक्षक अभियंता, बांधकाम मंडल, अमरावती यांनी केले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी ''कृती मूल्यमापन प्रणाली'' चे उद्देश व त्यामागील भूमिकेबद्दल सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले तसेच सन २०१२-१३ या वर्षा करीता आपले लक्ष्य कशा पद्धतीने पूर्ण करावे याबाबत सविस्तर माहिती दिली. सदर कार्यशाळेत वेतन गट १ व २ मध्ये कार्यरत सर्व अधिकारी उपस्थित होते कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन/मासं) यांनी निरसन केले.

कार्यशाळेच्या शेवटी श्री.अभय रोही, सहा महाव्यवस्थापक (मासं) यांनी आभार मानले व कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली.

सांघिक कार्यालयातील मान्यवरांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे सर्व अधिकारी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ''कृती मुल्यमापन प्रणाली'' अमलात आणण्याकरीता सर्वांचे मनोबल वाढले.

## वाशी परिमंडलातील महिला कर्मचाऱ्यांकरिता ''तेजस्विनी'' प्रशिक्षण वर्ग पडघा येथे संपन्न



महापारेषण कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढून त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वाशी परिमंडलातील महिला कर्मचाऱ्यांसाठी पडघा प्रशिक्षण केंद्रात विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. महापारेषण कंपनी व आय.एस.आय.एल. च्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण पार पडले.

सोमवार दि. १०.०९.२०१२ रोजी सकाळी ११ वाजता श्री.विकास बढे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडल यांच्या हस्ते या प्रशिक्षण वर्गाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी श्री. वंदन मेंढे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), सांघिक कार्यालय, मुंबई यांनी प्रास्ताविक केले. आय.एस.आय.एल. संस्थेच्या वतीने श्रीमती भाग्यश्री घोसाळकर, प्रशिक्षक यांनी प्रशिक्षण वर्गात देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास श्री.विजय पाटील, अधीक्षक अभियंता, पडघे, श्री. मधुसूदन देशमुख, कार्यकारी अभियंता व अन्य कार्यकारी अभियंते, तसेच श्री.पी.जे. कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन श्री.दिलीप पाटील, प्रमुख लिपिक व श्री.शिवलिंग हुंडीवाले यांनी केले. ३३ महिला कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

दि.१५.०९.२०१२ रोजी श्री.कांबळे, कार्यकारी अभियंता (प्रशासन), पघडे व श्री.पी.जे. कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं), वाशी, श्री.तिवारी, उपकार्यकारी अभियंता (प्रशिक्षण केंद्र) यांच्या हस्ते तसेच आय.एस.आय.एल.च्या श्रीमती भाग्यश्री घोसाळकर यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आली.

## नागपूर परिमंडलात आंतरमंडलीय नाट्यस्पर्धा संपन्न



बांधकाम प्रविभागाने सादर केलेले 'वादळवेणा' या नाटकातील एक दृश्य




बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि श्री. उत्तम झाल्टे संचालक (संचलन) भाषण करताना

अउदा बांध नि संवसु परिमंडल नागपूर येथील आंतर-प्रविभागीय नाट्य स्पर्धा सायंटिफीक सभागृह लक्ष्मीनगर, नागपूर येथे संपन्न झाल्या. नाट्यस्पर्धेचे उद्घाटन मा.श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प) यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मा. श्री. विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) होते.

नाट्यस्पर्धेमध्ये विविध प्रविभागांनी सादर केलेली नाटकं खालीलप्रमाणे

१. अउदा बांधकाम प्रविभाग, नागपूर- वादळवेणा
२. अउदा संवसु प्रविभाग, नागपूर- पुन्हा एकदा
३. अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर व - आग्टं
अउदा द्विष्ट धारा प्रविभाग, चंद्रपूर

तीनही नाटकांना प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. चंद्रपूर प्रविभागांतर्गत सादर करण्यात आलेल्या ''आग्टं'' या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच निता खारकर यांना उत्कृष्ट अभिनेत्री व श्री. नितिन कांडलकर यांना उत्कृष्ट अभिनेता म्हणून पारितोषिके प्रदान करण्यात आली.

नाट्यस्पर्धेचे बक्षीस वितरण व समारोपाचा कार्यक्रम मा.श्री. प्रमोद भुसारी, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखा व निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

उद्घाटन व समारोपाच्या कार्यक्रमात व्यासपीठावर आयोजन समितीचे अध्यक्ष व नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.लक्ष्मीदास सोनकवडे तसेच आयोजन समितीचे सचिव व अउदा बांधकाम प्रविभाग, नागपूरचे अधीक्षक अभियंता श्री.मिलिंद बहादुरे उपस्थित होते. मुख्य अभियंता श्री. लक्ष्मीदास सोनकवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच आयोजन समितीचे सचिव श्री.मिलिंद बहादुरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अशोक गजापुरे, उपकार्यकारी अभियंता यांनी केले. कार्यक्रमास नागपूर परिमंडलातील सर्व अधीक्षक अभियंते मोतीसिंग चव्हाण, अविनाश कोंडावार, अव्दैत देव, नरेश तेलतुंबडे, जयंत विखे व अशोक लाडे तसेच श्री. माजिद खान निसार खान, सहा. महाव्यवस्थापक (वि व ले), श्री.प्रकाश नाईक, सहा. महाव्यवस्थापक (मासं), उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्रीकांत काळे, विशाल मेश्राम, जयंत गणोरकर, अजय आठवले, श्रद्धा राऊत, अलका मडावी यांनी विशेष परिश्रम घेतले.



नाट्यस्पर्धेत प्रथम आलेल्या 'आग्टं' या नाटकातील एक दृश्य



नाट्यस्पर्धेत प्रथम आलेल्या 'आग्टं'च्या चमूला पारितोषिक प्रदान करताना उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) सोबत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमोद भुसारी, मुख्य अभियंता लक्ष्मीदास सोनकवडे

# वाशी परिमंडळ येथे आंतर-मंडल नाट्य स्पर्धा - २०१२ संपन्न

अउदा बांधकाम-नि-संवसु परिमंडल, वाशी यांच्या वतीने आगरी-कोळी संस्कृती भवन, सेक्टर-२४, नेरूळ, नवी मुंबई येथे आंतर-मंडलीय नाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

आंतर-मंडल नाट्य स्पर्धांचे उद्घाटन व दीपप्रज्वलन मा.श्री.उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन), यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), मा.श्री.विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प), श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. आंतर-मंडल नाट्यस्पर्धांचे उद्घाटन प्रसंगी श्री.विकास बढे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ यांनी प्रास्ताविक केले तसेच डॉ. श्री.अजय प्रधान, कनिष्ठ अभियंता (स्था) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व श्री.प्रकाश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं), यांनी आभार प्रदर्शन केले.

एकूण चार दिवस चाललेल्या या नाट्यस्पर्धेत पाच मंडलांनी नाटके सादर केली. विविध मंडलांनी सादर केलेली नाटके खालीलप्रमाणे-

| **नाटकाचे नांव** | **सादरकर्ते** |
|---|---|
| सानेंचं काही खरं नाही | अउदा संवसु मंडल, पनवेल |
| थ्री नॉट थ्री | अउदा बांधकाम मंडल, कळवा |
| माईंड गेम | अउदा स्थापत्य मंडल, ऐरोली |
| बॅलन्स-शीट | अउदा संवसु मंडल, कळवा |
| हा छंद जीवाला | सांघिक कार्यालय, मुंबई |
| **सांस्कृतिक कार्यक्रम** | **सांघिक कार्यालय, मुंबई** |

सर्व नाटकांचे सादरीकरण उत्तम प्रकारे करण्यात आले. या नाटकांचा आनंद घेण्याकरिता अधिकारी/कर्मचारीवर्ग कुटुंबियांसह मोठया प्रमाणात हजर होते. सर्व कलाकारांना टाळयांनी उत्स्फूर्त दाद देत प्रेक्षकांनी या नाटकांचा आस्वाद घेतला.




माइंड गेम नाटकातील एक दृश्य

आंतरमंडल नाटयस्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन, मासं) हे आवर्जून उपस्थित राहिले. मुख्य अभियंता श्री.विकास बढे यांनी स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. स्पर्धेतील अंतिम नाटक सादर झाल्यानंतर सांघिक कार्यालयातील युवा कलाकारांनी नृत्याचा सुंदरसा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन,मासं), यांच्या हस्ते विजेत्या नाटकांना व नाटकात काम करणाऱ्या कलाकारांना बक्षीसं वितरित करण्यात आली. सदर नाट्यस्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे-

| विभाग | क्रमांक | नाटक | विजेते |
|---|---|---|---|
| नाटक निर्मिती | प्रथम<br>द्वितीय | सानेंच काही खरं नाही<br>माईंड गेम | चंद्रकांत भोसले<br>अविनाश कसबेकर |
| दिग्दर्शक | प्रथम<br>द्वितीय | सानेंच काही खर नाही<br>माईंड गेम | सुनिल कदम<br>संतोष गडलग |
| अभिनय (पुरुष) | प्रथम<br>द्वितीय | सानेंच काही खर नाही<br>सानेंच काही खर नाही | दिलीप विचारे<br>रघुवीर कदम |
| अभिनय (स्त्री) | प्रथम<br>द्वितीय | माईंड गेम<br>हा छंद जीवाला | नूरी पाल<br>स्मिता वंजारी |
| नेपथ्य | प्रथम<br>द्वितीय | बॅलन्स शीट<br>थ्री नॉट थ्री | राकेश वधावन, नविंद्र नगरे,<br>अउदा बांधकाम मंडल, कळवा |
| प्रकाश योजना | प्रथम<br>द्वितीय | माईंड गेम<br>सानेंच काही खर नाही | एन. दिनेशन, एस.व्ही. कुंभारे<br>मोहन अटक, मनोहर बागले |
| संगीत | प्रथम<br>द्वितीय | माईंड गेम<br>हा छंद जीवाला | सौ. वृषाली राउत<br>सुधाकर पारधी |
| लक्षवेधी भूमिका | अ) पुरुष अभिनय<br>ब) स्त्री अभिनय | माईंड गेम<br>सानेंच काही खर नाही | अजय प्रधान<br>हर्षदा क्षेत्रे |
| नाट्यक्रम (पूर्ण नाटक) | प्रथम<br>द्वितीय | सानेंच काही खर नाही<br>माईंड गेम | |

आंतरमंडलीय नाट्यस्पर्धा नियोजित वेळेत पार पाडण्याकरिता विकास बढे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडल यांच्या अध्यक्षतेखाली प्रामुख्याने अधीक्षक अभियंते श्री.चंद्रकांत भोसले, श्री.सतीश गहेरवार, श्री.अविनाश कसबेकर, श्री.विजय पाटील, श्री. राजकुमार कांबळे, श्री.भगीरथ पसरटे व सर्व कार्यकारी अभियंता यांनी विशेष मदत केली तर सौ.सीमा डुबेवार, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्री.एम.एस. वेस्ली, कार्यकारी अभियंता (प्रशासन), श्री.दिलीप नंदनवार, उपकार्यकारी अभियंता, श्री.प्रकाश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं), आनंद सहस्त्रबुद्धे, सहाय्यक मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री.पी.एस. पाटील, व्यवस्थापक (विवले), श्री.जगन्नाथ जगताप, उपव्यवस्थापक (मासं), श्री.मुरलीधर सावरकर, उपव्यवस्थापक (मासं), आणि श्री. सुभाष सोनवणे, प्रमुख लिपीक यांनी सदर नाट्यस्पर्धेकरिता विशेष परिश्रम घेतले.

# वाशी परिमंडलातील आंतर-मंडल नाट्यस्पर्धेची क्षणचित्रे




आंतर-मंडल नाट्यस्पर्धेच्या उद्घाटन समारंभाकरिता व्यासपीठावर उपस्थित असलेले मान्यवर

आंतर-मंडल नाट्यस्पर्धेत प्रथम आलेलं नाटक 'सानेंचं काही खरं नाही' मधील एक दृश्य





आंतर-मंडल नाट्यस्पर्धेत द्वितीय आलेल्या 'माइंड गेम' या नाटकातील कलाकारांचा चमू

# महापारेषण कंपनीच्या नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडलाची बाजी



''सानेंचं काही खरं नाही''च्या चमूला पारितोषिक प्रदान करताना उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) सोबत वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. विकास बढे व इतर

महापारेषण कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडलाने सादर केलेल्या 'सानेंचं काही खरं नाही' या नाटकाला उत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा प्रथम पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा द्वितीय पुरस्कार नागपूर परिमंडलाने सादर केलेल्या 'आग्टं' या नाटकाला मिळाला. नवी मुंबईतील नेरूळमध्ये आगरी-कोळी संस्कृती भवनात नाट्स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली. विजेत्यांना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री.उत्तम झाल्टे व कार्यकारी संचालक (संचलन/मासं) श्री.सुभाष केळकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री.उत्तम झाल्टे यांनी नाट्यस्पर्धांच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाजापेक्षा काहीतरी वेगळं करण्याची संधी मिळते व अशा संधीमुळे वर्षभर कर्मचाऱ्यांना काम करण्याची ऊर्जा मिळते असे सांगितले. तसेच या नाट्यस्पर्धेत पुरस्कार मिळालेल्यांचं श्री.झाल्टे यांनी अभिनंदन केलं व ज्यांना पुरस्कार मिळाला नाही, त्यांनी यापुढे अधिक जोमाने प्रयत्न करावेत असे सांगितले, नाट्य स्पर्धेचे परीक्षक श्री.लीलाधर कांबळी यांनी महापारेषण कंपनीच्या नाट्यस्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांबद्दल व त्यांच्या कुटुंबियांबद्दल विशेष कौतुक वाटत असल्याचे नमूद केले.

सानेंचं काही खरं नाही हे नाटक म्हणजे एक सामाजिक विडंबन आहे. कोकणातून दीड रुपया घेऊन आलेल्या काशीनाथ साने या व्यक्तिरेखेचा जीवनप्रवास या नाटकात चितारण्यात आला आहे. या नाटकासाठी उत्कृष्ट दिग्दर्शनासाठीचा पुरस्कार श्री.सुनील कदम यांना प्रदान करण्यात आला. वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.विकास बढे 'सानेंचं काही खरं नाही' या नाटकाचे निर्माते आहेत. आग्टं या नाटकात आदिवासीच्या जीवनाचं विदारक वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आधीच शोषित असलेल्या आदिवासीची मरणानंतरही कशी परवड होते यावर या नाटकाचं कथानक आहे. उत्कृष्ट दिग्दर्शनासाठीचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार श्री.अविनाश निंबाळकर व सुनील सारडे यांना प्रदान करण्यात आला. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. लक्ष्मीदास सोनकवडे 'आग्टं' या नाटकाचे निर्माते आहेत.

महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दोन वर्षातून एकदा नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दि. २० नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर दरम्यान नवी मुंबईतील नेरूळ येथे आगरी-कोळी संस्कृती भवन येथे कंपनीच्या नाट्यस्पर्धा संपन्न झाल्या. कंपनीच्या सातही परिमंडलांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी वाशी परिमंडलातील कर्मचाऱ्यांनी 'गौरव महापारेषणचा' हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. याप्रसंगी कंपनीच्या वशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.विकास बढे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.पी.आर.देवरे, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.लक्ष्मीदास सोनकवडे, नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.एम.एल.सानप, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.आर.एन.मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री.संतोष आंबेरकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.अनंत पाटील तसेच महापारेषण कंपनीच्या विविध परिमंडलातील अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. नाट्यस्पर्धेसाठी लीलाधर कांबळी, रवी वाडकर आणि स्निग्धा सबनीस यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## नाट्यस्पर्धेचा सविस्तर निकाल खालीलप्रमाणे

### १. सवोत्कृष्ट नाट्यनिर्मिती / सवोत्कृष्ट नाटक-

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | सानेंचं काही खरं नाही | वाशी परिमंडल |
| द्वितीय क्रमांक | आग्टं | नागपूर परिमंडल |

### २. सवोत्कृष्ट दिग्दर्शन-

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | सुनील कदम | सानेचं काही खरं नाही (वाशी परिमंडल) |
| द्वितीय क्रमांक | अविनाश निंबाळकर, सुनील सारडे | आग्टं (नागपूर परिमंडल) |

### ३. सर्वोत्कृष्ट अभिनय (पुरुष)-

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | दिलीप विचारे | सानेंचं काही खरं नाही (वाशी परिमंडल) भूमिका-साने |
| द्वितीय क्रमांक | दत्ता गायकवाड | एका घरात होती (कराड परिमंडल) भूमिका-श्रीधर |

### ४. सर्वोत्कृष्ट अभिनय (स्त्री)-

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | नीता खारकर | आग्टं (नागपूर परिमंडल) भूमिका-बायजा |
| द्वितीय क्रमांक | प्रियंका अर्डक | कोण म्हणतं टक्का दिला ? (औरंगाबाद परि.) भूमिका- देवयानी |

### ५. सर्वोत्कृष्ट संगीत -

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | नारायण पेडणेकर (एका घरात होती) | (कराड परिमंडल) |
| द्वितीय क्रमांक | जगन्नाथ जगताप (सानेंचं काही खरं नाही) | (वाशी परिमंडल) |

### ६. सर्वोत्कृष्ट रंगभूषा व वेशभूषा-

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | आग्टं | सुनील कदम व इतर (नागपूर परिमंडल) |
| द्वितीय क्रमांक | एक घरात होती | गजानन सुतार व इतर (कराड परिमंडल) |

### ७. लक्षवेधी भूमिका-

१. श्रीधर अडके (सासरचं दुखणं-पुणे परिमंडल)
२. वृंदा महाजन (सानेंचं काही खरं नाही-वाशी परिमंडल)



## स्वप्निल गायकवाडची आयआयटी मद्रास येथे निवड

सन २०१२ मध्ये झालेल्या आय.आ.टी. / जे.ई.ई. परीक्षेत स्वप्निल अशोक गायकवाड उत्तीर्ण झाला असून त्याची निवड आय.आय.टी. मद्रास येथे झाली आहे. १३२ के.व्ही. उपकेंद्र शिरूर जि. पुणे येथे कार्यरत असलेले श्री. अशोक दादा गायकवाड, (वरिष्ठ यंत्रचालक) यांचा स्वप्निल हा मुलगा आहे.

चि. स्वप्निल याला बारावीच्या परीक्षेत ८०% गुण मिळाले होते व दहावीच्या परीक्षेत ९२% गुण मिळाले होते. स्वप्नीलचे शालेय शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय, पिंपळे-जगताप येथे झाले आहे. त्यानंतर आय.आय.टी., जे.ई.ई. परीक्षेच्या तयारीसाठी तो कोटा (राजस्थान) येथे प्रशिक्षण घेत होता. पुढे आय.ए.एस. होण्याची स्वप्निलची इच्छा आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



## अहमदाबाद येथील जलतरण स्पर्धेसाठी चि. अंशुल बनसोडची निवड

चि.अंशुल सुनिल बनसोड याची केंद्रीय विद्यालय बोर्ड, दिल्ली यांच्या वतीने अहमदाबाद येथे झालेल्या जलतरण स्पर्धेसाठी पश्चिम विभागातून निवड करण्यात आली. चि.अंशुल हा ४०० केव्ही खारघर ग्रहण केंद्र, चाचणी उपविभाग येथे उप कार्यकारी अभियंता, चाचणी या पदावर कार्यरत असलेले श्री.सुनिल बनसोड यांचा पाल्य आहे.

चि.अंशुल सुनिल बनसोड हा इयत्ता ६ वी, बालभारती विद्यालय, केंद्रीय बोर्ड, खारघर, नवी मुंबई येथे शिकत आहे. तो वयाच्या चौथ्या वर्षापासून रोज २-३ तास पोहण्याचा सराव करतो. पश्चिम विभागातर्फे तसेच महाराष्ट्र राज्य स्तरीय जलतरण स्पर्धेसाठी सन २०११ व सन २०१२ साली निवड झाल्याबद्दल चि. अंशुलचे हार्दिक अभिनंदन.

## टेबिल टेनिस स्पर्धेत सौ. अलका कुलकर्णी यांना रौप्यपदक



सौ.अलका कुलकर्णी यांचा सत्कार करताना
नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.एम.एल. सानप

३८व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाच्या सन २०१२ च्या टेबल टेनिस क्रिडा स्पर्धा दि. १९.११.२०१२ ते २२.११.२०१२ या कालावधीत रायचूर, कर्नाटक येथे पार पडल्या. या क्रिडा स्पर्धेत महापारेषण कंपनीकडून नाशिक परिमंडलांतर्गत अउदा स्थापत्य बांधकाम नि संवसु मंडल, नाशिक येथे कार्यरत असलेल्या सौ.अलका मुकुंद कुलकर्णी, उप-व्यवस्थापक (विवले) यांनी भाग घेऊन व्यक्तिगत (Open Single Individual Game) गटात अखिल भारतीय पातळीवर रौप्यपदक प्राप्त केले. तसेच सौ.कुलकर्णी यांनी महापारेषण कंपनीच्या टेबल टेनिस संघाचे कप्तानपद भूषवून अखिल भारतीय पातळीवर तृतीय पदक पटकावले.

नाशिक परिमंडल कार्यालयात सौ. अलका मुकुंद कुलकर्णी यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्य अभियंता श्री. एम.एल. सानप यांनी त्यांच्या शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## उत्कृष्ट सेवेबद्दल वाहनचालक श्री. खर्जुले यांचा सत्कार



श्री.संदीपान खर्जुले यांचा सत्कार करताना औरंगाबाद परिमंडलाचे
मुख्य अभियंता श्री.आर.एन. मस्के

श्री.संदीपान बापुराव खर्जुले, वाहन चालक, अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग, लातूर अंतर्गत उपविभाग, लातूर येथे कार्यरत असून यांनी मागील ३० वर्षे विना अपघात कंपनीचे वाहन चालवून कंपनीची सेवा केल्याबद्दल श्री.आर.एन.मस्के, मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडल यांनी २०१०-२०११ या वर्षासाठी त्यांना रु. ७५००/- चा प्रोत्साहनपर धनादेश देऊन श्री.खर्जुले यांचा सत्कार केला.

### सूचना

**महापारेषण समाचारसाठी फोटो पाठवताना कृपया हार्ड कॉपी न पाठवता सॉफ्ट कॉपी prohr@mahatransco.in या ई-मेलवर मेल करावी.**

## Empowering Communication

An organization is like a human body. For a person to live, every part should be well coordinated and synchronized. From functioning of the eyes to movement of hands to understanding the needs, all features of an individual are similar to managing an organization. And thus, as the heart controls the human being, communication is the heart of organization.

Though simple it may seem communication is much more than simply having a conversation or an interaction. Communication is an art which needs to be polished and developed. Communication is a system which enables a cooperative and collective environment in an organization. Internal communication amongst employees is pivotal so as to work collectively for a common objective. Apart from internal communication, interpersonal communication between employees also helps to build stronger relations and bonds amongst them. Good communication also helps in establishing a control over the employees. Like everything else in this world, communication too has its pros and cons. If channeled properly, communication can prove to be a boon for any organization. However, if certain aspects of communication are misinterpreted, then possibilities of a backlash are also strong.

The success of an individual in a team depends greatly on the extent to which he can engage in effective communication. Faulty communication in organizations can lead to lowered efficiency and effectiveness at the organizational as well as individual level. Also most of the interpersonal friction can be traced to faulty communication. Interpersonal communication takes places every time we interact with others. Communication is considered effective when it succeeds in evoking a desired response from the other person. Moreover failures in communication can be very costly for the organization by way of reduced co-operation and subsequent ill feeling between employees. Communication, to be effective, cannot be a haphazard process. It has to be planned and executed so that it evokes the desired response.

Communicating the correct values and required information is essential. One of the great scholars, Millet has said that communication is the blood stream of an organization. Apart from the technical aspect, basics like clarity, consistency and uniformity are also essential in communication, be it internal or external. Thus, while communicating it should be remembered that words once spoken can never be taken back, and that it would represent the ultimate image in the mind of the listener.

*From The Desk Of ED (HR)*

## Effective coordination is one of the key success factors for building high performance team

In the organization role and responsibilities of employees are connected horizontally and vertically. A person performing that role is connected in 360 degree for fulfillment of his work. No role in the organization is isolated, even the role of leader of the organization who is connected horizontally to our stakeholders. In fact that role of connecting to stake holder is most crucial and responsible.

The reporting relationship of the post clearly spells out where and how that post is connected formally. The person has to discharge his duty by coordinating well with his connect points. The success rate of the person shall depend of his degree of coordination skills. Thus, coordination which is one of the vital functions of general management becomes important for every officer.

The activities emerge out of coordination function is to talk, discuss, review, monitor, guide, coach, etc. The outcome of coordination is to progress, fulfillment, planning, closing, etc. The coordination is input and fulfillment is output. Such activities need not to perform only formally, one can use his leadership qualities most creatively to connect with people. The manager should develop effective formal and informal channels for effective coordination. Everyone in the organization hierarchy needs to work in coordinated fashion. Any gap in coordination shall reflect adversely in quantity and quality of our service.

It is seen in the organization that managers assume that the given instructions of work will be carried out and gets reprimanded for gap in the performance. Companies that lack the ability to coordinate and integrate plans act like a body without a head. Though employees have the ability and skill sets necessary to carry out directives, their work needs guidance.

Coordination is required whenever and wherever a group of persons work together to achieve common objectives. It is the basic cementing force in an organisation. Coordination becomes necessary because of the disintegrating forces like increase in size and complexity of operations, specialization, Clash of interests, different outlook, interdependence of units, conflicts, empire-building, personal jealousies and rivalries. Effective coordination enables higher efficiency and economy, good human relations, unity of direction, quintessence of management and last but not least the Organizational Effectiveness. Thus, it is earnest request to all to develop coordination skills which will enable building high performance team.

संपादक : श्री.सचिन ढवण, जनसंपर्क अधिकारी
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.